स्थायी समिती
दाखल विषय – दि. १५/६/२०२१

विषय क्रमांक :– ३६२ त्वर्य

**पुणे मेट्रो लाईन ३( हिंजवडी ते शिवाजीनगर) या मेट्रो प्रकल्पाचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मार्फत बांधकाम सुरु करणेबाबतचा** यापूर्वी मा. मुख्य सभेने मान्य केलेला ठराव क्रमांक ९२५ दिनांक १७/१२/२०१८ मधील मुद्दा क्र. ३ मध्ये अंशत: बदल करून खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुख्य अभि.(प्रकल्प)/२०६ दि.८/६/२०२१ चे पत्र.

१) प्रस्तावित स्थानके व मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या जिन्यांचे स्थान नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी परवानगी देणेस.

२) प्रस्तावित मेट्रो संरेखा सर्वसाधारण मार्गिका रुंदी जागा उपलब्धता अंतिम विकास आराखड्यातील रस्ता मध्य रेषेप्रमाणे जागा उपलब्ध करून देणेस.

३) मनपा हद्दीतील रस्त्याखालील जागा विना मोबदला, विना अडथळा उपलब्ध करून देणेस व स्टेशन्स जिन्यासाठी आवश्यक जागा मनपाच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून योग्य त्या मोबदल्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास रितसर मालकी हक्काने हस्तांतरित करणेस, तसेच या प्रकल्पासाठी पुणे मनपा हद्दीतील विकास योजना आराखड्यातील बाधीत होणाऱ्या क्षेत्रासाठी खाजगी जमिनीचे भूसंपादन आवश्यक तेथे एफ.एस.आय. / टी.डी.आर. स्वरुपात आणि जेथे एफ.एस.आय. / टी.डी.आर. स्वरुपात जागा ताब्यात येणार नाहीत तेथे भूसंपादन कायद्यान्वये भूसंपादनासाठी येणारा खर्च पुणे महानगरपालिकेने करणेस, व पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्याव्यतिरिक्त (Non DP) जागांचे भू संपादन पुणे महानगर विकास प्राधिकरण यांचेमार्फत करणेस.

४) पुणे महानगरपालिकेच्या अंतिम विकास आराखड्यातील प्रस्तावीत रस्ता रुंदीनुसार जागा उपलब्ध करून देणेस .

५) पुणे विदयापीठ चौकातील, एच.सी.एम.टी.आर. च्या आखणीच्या ठिकाणी सुयोग्य नियोजन करून वाहतूक सुधारणा विषयक कामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने करणेस.

६) या कामामुळे बाधित होणाऱ्या सेवा वाहिन्यांचे स्थलांतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने स्वखर्चाने व संबंधित विभागांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली करणेस .

७) मेट्रो ३ प्रकल्पामधून मेट्रो १ व २ प्रकल्पा पर्यंत वाहतूक संक्रमण व्यवस्था कामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खर्चाने करणेस.

८) सदरचा मेट्रो प्रकल्प पूर्ण करणेसाठी लगतच्या आवश्यक त्या परवानग्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वखर्चाने घेण्यास.

९) तांत्रिक निकषानुसार व आवश्यकतेनुसार हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यानच्या मेट्रो मार्गामध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यास तसेच मान्य विकास आराखड्यातील रस्त्याच्या आखणी व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार मेट्रो मार्गाची आखणी करणेस.

१०) प्रस्तावित मेट्रो ३ मार्गाच्या आखणी बाबत व टी.ओ.डी. (TOD) धोरणाबाबत मे. शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करणेस.

विषय क्रमांक :– ३६३ त्वर्य

३० दलली/दिन बाणेर मैलापाणी शुध्दिकरण केंद्र पाच वर्षे चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गिरीश एंटरप्रायजेस प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ५,५८,२०,०९६/– (प्रति वर्ष रक्कम रु. १,११,६४,०१९=२० प्रमाणे पाच वर्षे र.रु. ५,५८,२०,०९६/–) पेक्षा १४.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,७७,८२,००२=१८ वस्तू व सेवा करासह अधिक विविध कायदे व नियमांनुसार सेवकांचे वेतनामध्ये होणारा फरक या नुसार होणाऱ्या रकमेपर्यंत पाच वर्षे काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२१६ दि. ११/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३६४ त्वर्य

प्रभाग क्र. २७ मधील शिवनेरी नगर रस्त्याच्या उतार कमी करून रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श भारत इनव्हायरो प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,३६,०४६=१० पेक्षा १९.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२२,८१,५९९=०९ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ३,४०,३२५=५३ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २३,६२६/– पर्यंत विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२१७ दि.१४/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३६५ त्वर्य

हडपसर येथे विस्थापितांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांची विविध दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्ही.अँड व्ही असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,७१,१५,२४७=६५ पेक्षा ९.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,५४,०३,८९४=०३ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस आधिक जी.एस.टी. र.रु. २०,५३,८२९=७२ अधिक टेस्टिंग चार्जेस र.रु. १२,८१०/– पर्यंत अदा करणेस व निविदा अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/२१९ दि. १५/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३६६ त्वर्य

सन २०२१–२०२२ आर्थिक वर्षाकरिता कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये झाडणकामाकरिता मजूर पुरविणे व त्यांच्याकडून काम करुन घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदित्य सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,३१,०२,८६१=२० पेक्षा २.७५% जास्त) असल्याने त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. ५/२२० दि.१५/६/२०२१ चे पत्र.

१) कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये झाडणकामाकरिता मजूर पुरविणे व त्यांच्याकडून काम करुन घेणे हे काम ठेकेदार मे.आदित्य सप्लायर्स यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (२.७५% जास्त) र.रु.१,३४,६३,१८९=८८ (अक्षरी र.रु. एक कोटी चौतीस लक्ष त्रेसष्ठ हजार एकोणनव्वद रुपये व अठ्ठयाऐंशी पैसे) नुसार उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या मर्यादेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस
२) सदरचे काम दिनांक १/५/२०२१ पासून सुरु करण्यासाठी पश्चात मान्यता मिळण्यास

विषय क्रमांक :– ३६७ त्वर्य

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवांना ३ महिन्यांची मुदत वाढ देणेसाठी पुढील येणाऱ्या लाटेच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२२४ दि. १५/६/२०२१ चे पत्र.

१. ३ महिने कालावधीकरिता प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या **४८ कंत्राटी सेवकांना दि. १३/०६/२०२१ व ४ कंत्राटी सेवकांना दि. २६/०७/२०२१ रोजी नंतर** एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन रोस्टर लागू असल्याने पुढील तीन महिन्यांच्या कालावधीकरिता मुदत वाढ देणेस.
२. सदर कालावधीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्यास व खात्यास या सेवकांची गरज न भासल्यास सदर सेवकांची सेवा संपुष्टात आणणेस.
३. सदर पदावरील सेवांकरीता संबंधित सेवकांकडून नव्याने करारनामे करून घेणेस.
४. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस.

विषय क्रमांक :– ३६८ त्वर्य

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवांना ३ महिन्यांची मुदत वाढ देणेसाठी पुढील येणाऱ्या लाटेच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२२५ दि. १५/६/२०२१ चे पत्र.

१. **३ फिजिशियन, १ आय.सी.यु. फिजिशियन, २८ वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) २१ स्टाफ नर्स, ६ वैद्यकीय अधिकारी (कोविड१९ आयुष) (बी.ए.एम.एस), २८ वैद्यकीय अधिकारी (कोविड१९ आयुष) (बी.एच.एम.एस), २ वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस) व १७ प्रयोगशाळा सहाय्यक** या पदाच्या पूर्वी कार्यरत असलेल्या कंत्राटी सेवकांना मान्यताप्राप्त झाल्यानंतर नियुक्ती च्या दिनांकापासून ४४ दिवसांच्या कालावधीकरिता ३ महिनेपर्यंत नेमणूक देणेस.

२. **६४ वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.), ४७ स्टाफ नर्स, ८ दंतशल्यचिकित्सक, १३ फार्मासिस्ट व २२ प्रयोगशाळा तंत्रज्ञ** या पदाच्या पूर्वी कार्यरत असलेल्या कंत्राटी सेवकांना मान्यताप्राप्त झाल्यानंतर नियुक्ती च्या दिनांकापासून ४४ दिवसांच्या कालावधीकरिता ३ महिनेपर्यंत नेमणूक देणेस.

३. सदर कालावधीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्यास व खात्यास या सेवकांची गरज न भासल्यास सदर सेवकांची सेवा संपुष्टात आणणेस.

४. सदर पदावरील सेवांकरीता संबंधित सेवकांकडून नव्याने करारनामे करून घेणेस.

५. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस.

विषय क्रमांक :– ३६९ त्वर्य

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत सर्व प्रभागातील पडीक हद्दीतील स्वच्छतेसाठी बिट्स नुसार झाडण काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./श्री.संतोषी एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,७६,४६,७६८/– पेक्षा ०.४०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,७८,३७,३५५=०७ पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी व शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने व आउटसोर्सिंग कचरावेचक कंत्राटी कामगारांचे निविदा उघडलेल्या दिनांकापासून (दि.२४/५/२०२१) वेतन अदा करणेस व देयके देणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. ५/२२६ दि.१५/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३७० त्वर्य

ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील चेम्बर्स समपातळीत करणे, आर.सी.सी. चेंम्बर्स करणे, क्षेत्रिय कार्यालयनिहाय मोबाईल मेन्टेनन्स युनिट द्वारे देखभाल दुरुस्तीची कामे करणे व तदनुषंगिक इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६६,०१,०७५=५० पेक्षा ३६.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,५९,३३७=६७ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,९२,१२९=०६ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ७,२०८/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२७ दि.१५/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३७१ त्वर्य

पुणे मनपाच्या बॅच मिक्स प्लान्टमार्फत पुणे शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर आवश्यकतेनुसार रिसर्फेसिंगची कामे व इतर तदनुषंगिक इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.भवानी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,२४,८७१/– पेक्षा ३०.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,१७,९५७=६३ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,७०,९८४=५२ पर्यंत काम करणेस, त्यांचेबरोबर करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२२८ दि.१५/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ३७२ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध रस्ते दुभाजकांचे उद्यान विषयक सुशोभिकरण व विकसन देखभाल देखरेख व दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ठेकेदार मे.अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.१,७२,५९,४८०/– पेक्षा ०.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,७२,२३,२३५=०९ पर्यंत देखभाल दुरुस्तीचे काम असल्याने भाववाढ सूत्र वगळून काम करून घेणेस व १2% जी.एस.टी. प्रमाणे र.रुपये २०,६६,७८८=६१ पर्यंत अदा करणेकरिता त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उदयान/२२९ दि. १५/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ३७३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिकांची त्यामधील प्रत्यक्ष राहणा-या पुर्नवसित नागरिकांना शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दर + मोकळया जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार विक्री करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१७३,दि.०१/०६/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४५ दि. १४/६/२०२१ विचारासाठी.

१ विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार, पुणे मनपाच्या मालकीच्या सदनिका या रस्तारूंदीकरण वा अन्य प्रकल्प बाधितांना भाडेतत्वावर देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. अशा प्रकारे पुणे मनपाच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत २१९९ सदनिका प्रकल्प बाधितांना वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

(अ) पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या सदनिका

उपरोक्त नमूद तरतुदीनुसार विकसकांकडून पुणे महानगरपालिकेस आतापर्यंत एकूण २९२३ सदनिका प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी २१९९ सदनिकांचे वाटप प्रकल्प बाधितांना, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील बाधितांना ट्रान्झिट कॅम्प म्हणून करण्यात आलेले आहेत. सध्या ७२४ सदनिका रिकाम्या असून यापैकी २९ सदनिका कात्रज कोंढवा रस्ता, ७२ गणेश खिंड रस्ता, ९५ चाळ विभाग, ४४५ मेट्रो विभागाकरीता, २८ कोथरूड क्षेत्रीय कार्यालय यांचेसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ५५ सदनिका विविध ठिकाणी रिक्त आहेत. एकूण सदनिकांचा तपशील मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये जोडलेला आहे.

(ब) कायदेशीर तरतूद

**(१) पुणे महानगरपालिकेच्या सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| ECONOMICALLY WEAKER SECTION HOUSING (EWS)FOR RETAINABLE LAND DECLARED UNDER UL (C&R)ACT, 1976 | |
|---|---|
| Certain number of sites demanded by te Pune Municipal Corpration/ Pune Housing and Area Development Authority Board are to be reserved for the same purpose Remaining sites are to be deleted and lands to be included in residential zone. | Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers. |

**तसेच सन २०१७ रोजी मान्य विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| | |
|---|---|
| Residential (R)-<br>(a)Public Hosing EWS/LIG Housing | The Planning Authority/Appropriate Authority shall allot such tenement on priority to the persons dispossessed by implementation of Development Plan. |

उपरोक्त नमूद विकास नियंत्रण तरतुदीनुसार हे लक्षात येते की, यापूर्वी सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये -

Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers. अशी तरतूद होती. मात्र २०१७ मधील विकास नियंत्रण नियमावलीमध्ये केवळ प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिलेले आहे. फक्त त्यांनाच सदनिका द्याव्यात असे बंधन घालण्यात आलेले नाही.

**(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ - नगर पालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करणेसंबंधी तरतूदी :-**

(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

(ड) जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**(३) पुणे महानगरपालिका मिळकत/जागा वाटप नियमावली मधील भाग ३ मधील कलम ५–**

जागा वाटपासंबंधीचे अधिकार – महानगरपालिकेची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने, किमान चालू बाजारभावाने भाडेपट्टा अथवा विक्री करून देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

**(क) सदनिका विक्री करावयाची आवश्यकता**

**अ)** पुणे मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या सदनिकांचा वापर पुणे महानगरपालिकेच्या प्रकल्प बाधीत नागरिकांच्या पुनर्वसनाकरीता करणेत येत आहेत. यामधील पुनर्वसन करण्यात आलेले बहुतांश नागरिक झोपडपट्टीधारक आहेत. सदर नागरिकांकडे साधारण रू. ३.६३ कोटी भाड्याची इतकी रक्कम थकबाकी आहे. याबाबत मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तथापि त्यास मिळणारा प्रतिसाद अत्यंत कमी आहे. त्यामुळे सदनिकांचे भाडे वसुल करण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय खर्च होतो. प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेला अत्यंत किंमती मालमत्ता विनाकारण सांभाळावी लागते व त्याची देखभाल करावी लागते. त्यावर पुणे मनपाचा खर्च होत असतो.

सदनिका विक्रीचे महानगरपालिकेला होणारे फायदे –

**अ)** मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे असणारा अपुरा सेवकवर्ग तसेच सदनिकाधारकांची भाडे भरण्याबाबत उदासिनता लक्षात घेता या सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** त्या सदनिकेत सध्या राहणाऱ्या पुर्नवसित नागरिकास विक्री केल्यास व त्यास अपेक्षीत प्रतिसाद मिळाल्यास पुणे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसुली उत्पन्न प्राप्त होईल. याची अंदाजीत महसूल रक्कम रू. ८७.०० कोटी होत आहे.

**ब)** सदर सदनिकांवर पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे.

**क)** सदर सदनिकांची विक्री केल्यानंतर या सदनिकांना कर आकारणी केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वार्षिक वाढ होणार आहे.

**(ड) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाचा प्रस्ताव**

भविष्यातील आवश्यकता वा गरज विचारात घेवून पुनर्वसन झालेल्या सदनिका विक्रीबाबत खालीलप्रमाणे महत्वाचे टप्पे राहणार आहेत. **पुणे महानगरपालिकेस २९२३ सदनिका विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये फक्त सदनिका प्राप्त झालेल्या असून सदनिकांखालील जमीन पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.**

१) पुणे महानगरपालिकेकडे प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन केलेल्या एकूण ३८ इमारती व त्यामधील १२६० सदनिका संपूर्णपणे व्याप्त असल्याने पहिल्या टप्प्यात या इमारतींमधील सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करण्यात येणार आहे. याची यादी मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट ब नुसार जोडली आहे.

२) सदर योजनेला मिळणारा प्रतिसाद विचारात घेवून पुढील टप्प्यात अन्य इमारतींमधील सदनिका याच धोरणानुसार विक्री करण्यात येतील.

३) संपूर्ण इमारतीची विक्री झाल्यानंतर, सदर सदनिकांवरील पुणे महानगरपालिकेचा मालकी हक्क संपुष्टात येवून त्यांचेशी पुणे महानगरपालिकेचा कोणताही संबंध राहणार नाही.

४) विक्रीसाठी प्रस्तावित संपूर्ण इमारतीमधील काही सदनिकाधारकांनी सदनिका खरेदीस नकार दर्शविल्यास अशा सदनिका धारकांचे अन्य इमारतीमध्ये स्थलांतर करणेत येईल व अशा मोकळ्या सदनिकांमध्ये इतर इमारतीमधील, खरेदीने सदर सदनिका घेऊ ईच्छित असणाऱ्या कुटुंबास स्थलांतरीत करून संपूर्ण इमारत विक्री योग्य करणेचे अधिकार पुणे महानगरपालिकेस राहतील.

५) सदनिकांची विक्री करताना त्यावरील शासनाच्या दरानुसार होणारी स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. सदनिका धारकास भरावी लागेल.

६) सदनिका विक्री करीता **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** हा आधारभूत दर म्हणून ग्राह्य धरून सदनिकांची किंमत प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

७) सदर सदनिका कुटुंबातील पती पत्नीचे नावे करण्यात येणार आहे.

**(इ) कार्यपद्धती**

१) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिका विक्रीकरीता वर्तमान पत्रामध्ये जाहीर प्रकटन देणे.

२) सदनिकांचे प्रचलित **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** मुल्यांकन निश्चित करणे.

३) सदनिकांच्या **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** निश्चित केलेल्या मुल्यांकनावर स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. निश्चित करणे.

४) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिका धारकांकडून अर्ज दाखल करून घेणे. अर्जासोबत पुनर्वसना बाबत दिलेले पत्र, अनामत रक्कम पावती, आधारकार्ड, लाईट बील, मतदान कार्ड, रेशनकार्ड व भाडे थकीत नसल्याचा दाखला हे पुरावे जोडून घेणे व सदनिकेच्या किंमतीच्या १०% रक्कम भरून घेणे.

५) अर्जाची छाननी करणे.

६) पात्र अर्जदारांकडून **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** होणारी सदनिकेची संपूर्ण रक्कम भरून घेवून खरेदीखत सदनिका धारकांकडून स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. जमा करून खरेदीखताची नोंदणी करणे.

७) विक्री केलेल्या इमारतीनुसार (एका इमारतीनुसार) सहकारी गृहनिर्माण सोसायटी स्थापन करून घेणे आवश्यक आहे व त्याची स्टॅम्प डयुटी संबंधीतांनी भरणे.

८) सोसायटी स्थापन झाल्यानंतर भूखंडाबाबत सोसायटीशी कन्व्हेयन्स डीड करून देणे.

९) विकास नियंत्रण नियमावली सन २०१७ व युनीफाईड डी.सी. रूल मधील तरतूदीनुसार ज्या प्रकरणी प्लॉटसह पुणे महानगरपालिकेस बांधीव क्षेत्र प्राप्त झाले आहे. अशा प्रकरणी सदनिकेची किंमत निश्चित करताना प्लॉटची किंमत चालू रेडीरेकनर नुसार समाविष्ट करणेत येणार आहे.

रिक्त सदनिका पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांकरीता प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी राखून ठेवण्यात येतील. तसेच सध्या रिक्त असलेल्या सदनिकांची यादी मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट क नुसार जोडली आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या दि. ०५/०६/१९९७ रोजी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झालेल्या सुधारणेमधील अॅपेंडीक्स आर-७ च्या तरतुदीनुसार जी आरक्षणे जागा मालक यांनी विकसीत केली आहेत अशा प्रकरणी पुणे महानगरपालिकेस जे बांधीव क्षेत्र हस्तांतरीत केले आहे व हे क्षेत्र म्हणजेच सदनिका या तरतुदीनुसार प्रकल्प बाधितांना प्राधान्याने वाटप केलेले असल्याने व सदर विस्थापित नागरिक त्या ठिकाणी वास्तव्यास असल्याने (परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या) त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (ड ) आणि पुणे महानगरपालिका मिळकत/जागा वाटप नियमावली मधील भाग ३ कलम ५ नुसार **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करणेस.

२) थकबाकीदार प्रकल्पबाधितांना थकीत भाडे भरण्यासाठी ३ महिन्यांची मुदत देवून सदर मुदतीत थकीत भाडे न भरल्यास त्यांना सक्तीने निष्कासित करणेस व निष्कासित केल्यानंतर रिक्त होणाऱ्या सदनिका खुल्या बाजारात शिघ्रसिद्धगणक दराने जाहीर निविदा प्रक्रियेद्वारे विक्री करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची अंमलबजावणी करावी.

विषय क्रमांक :- ३७४ त्वर्य

मा.सुनिल गायकवाड व मा.प्रशांत जगताप यांचे दि.१४/६/२०२१ चे पत्र.

पुणे शहरातील गोठे धारकांचे स्थलांतर सन २०२१ अखेरपुर्ण करण्याच्या दृष्टीने श्री.इंगोले गौतम बळीराम सदर सेवकांने मालमत्ता व्यवस्थापनाकडे स.नं.६ व ९ ते १४ केशवनगर मुंढवा येथे सदर जागेवरील दुरूस्त लेआऊट टोटल स्टेशन द्वारे सर्व्हे व मोजणीचे काम पाहीले आहे.

तसेच गोठे धारकाचे काम हे मालमत्ता व्यवस्थापना कडून आरोग्य खात्याकडे सोपविण्यात आलेले आहे. त्यामुळे आरोग्य खात्याला मेंन्टेन्स सर्व्हेअर ची अत्यंत गरज आहे.

त्यांचा अनुभव लक्षात घेता सदर सेवकाची आरोग्य खात्याकडे मेंन्टेन्स सर्व्हेअर म्हणून त्यांची सहा महिने मुदतीसाठी प्रतिमहा रू.३०,०००/- एकवट मानधनावर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- ३७५ त्वर्य

मा.अरविंद शिंदे, मा.अजित दरेकर, मा.योगेश ससाणे व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. १४/६/२०२१ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने आरोग्य विभागाकडील कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ देण्यात यावी असा ठराव पारित केलेला आहे. कोरोनाने माहे मार्च २०२० मध्ये पुणे शहरात प्रवेश केल्यापासून कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेंतर्गत पुणे महापालिकेच्या सर्व विभागाकडील अधिकारी / कर्मचारी यांनी जीवाची पर्वा न करता विलगीकरण कक्ष, कोविड केअर सेंटर, सर्व्हेक्षण व तत्सम कामे पार पाडलेली आहेत. आरोग्य विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी केलेले काम कौतुकास्पदच आहेच. त्याप्रमाणे पुणे महापालिकेतील सर्व विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजनेंतर्गत काम केल्याने त्यांना देखील एक वेतनवाढ देण्यास मान्यता द्यावी

विषय क्रमांक :– ३७६ त्वर्य
मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि.१५/६/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिका ही स्मार्ट सिटी मध्ये देशातील पहिल्या १० शहरांमध्ये गणली जाणारी मनपा आहे. या पुणे शहरातील मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये जवळजवळ १ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये माध्यमिक विभागाकडे १०७०० व उर्वरित प्राथमिकविभागाकडे शिक्षण घेत आहेत. इ. ४ थी ते ८ वी मध्ये ३८००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांमधील प्रत्येक विद्यार्थी हे आर्थिक दृष्टया गरीब कुटुंबातील आहेत. या विद्यार्थ्यांची कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे वाताहत झालेली आहे.

कोरोना काळात रोजगार नाही. छोटे मोठे व्यवसाय ठप्प झालेले आहेत. थकीत बँकेचे कर्ज, वाहन कर्ज, विजबिल इ. जीवन जगण्याच्या साधन देखील कमी असल्या कारणाने घरात पोटाला अन्न ही मिळणे कठीण झाले आहे. अशा प्रकारे आर्थिक वाताहत झालेल्या परिस्थितीत १ लाख शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारमय झाले आहे. खुद्द शिक्षण विभागाने ४३ टक्के विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन शिक्षणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. असे सांगितलेली आहे. त्यांनी सांगितलेली आकडेवारीही ती चुकीची आहे. ८० टक्के विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करीता साधनसामग्री उपलब्ध नाही.

सन २०२०–२०२१ च्या अंदाजपत्रकामध्ये डीबीटी च्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्याना गणवेश, दफ्तर, रेनकोट, बूट , स्वेटर इ. करीता आपण जे पैसे मनपामार्फत त्यांच्या खात्यावर जमा करत होते. त्यामधील १ ही रूपया खर्ची पडलेला नाही . तसेच सन २०२१–२०२२ च्या अंदाजपत्रकामध्ये हे पैसे तसेच अंदाजपत्रकावरती शिल्लक आहेत.

तरी आपणास विनंती आहे की, हे पैसे माध्यमिक व इ. ४ थी ते ८ वी च्या प्राथमिक विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाकरीता इंटरनेट पॅक व टॅब विकत घेवून त्यांना द्यावा. एक टॅब इंटरनेट सुविधेसह कंपनीकडून विकत घेतल्यास तो ५००० पर्यंत आपणास मिळू शकेल. जेणेकरून ५०००० विद्यार्थ्यांना २५ कोटीचा खर्च अपेक्षित आहे. आपल्याकडे डीबीटी मध्ये १७ कोटी रू. गेल्या वर्षीचे शिल्लक असून यावर्षीची रक्कम देखील अंदाजपत्रकामध्ये तशीच शिल्लक आहे.

तरी आपण माध्यमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही दक्षता घ्यावी व डीबीटी चे पैसे ऑनलाईन शिक्षणाच्या साधनांसाठी खर्च करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ३७७ त्वर्य
मा.सौ.अर्चना पाटील व मा.सौ.मनिषा कदम यांचे दि.१५/६/२०२१ चे पत्र.

कात्रज स्मशानभूमी मध्ये अंत्यविधीसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य उदा.बांबू, लाकूड, गवरी व ब्रिकेट इत्यादी सामान मयत व्यक्तीच्या कुटुंबियांना पुरविणे व सेवा देणे या कामासाठी कोणत्याही व्यक्तीचे अथवा संस्थेचे नेमणूक करण्यात आलेली नसून कात्रज स्मशानभूमी येथे आलेल्या मयत व्यक्तींच्या नातेवाईकांची मोठी अडचण होत असते. सबब उपरोल्लिखित साहित्य पुरविण्याच्या कामासाठी जे.पी.एंटरप्रायझेस यांना नाममात्र भाडेतत्वावर ११ महिन्यांच्या भाडे करारावर यांना अंत्यविधीचे साहित्य, बांबू, लाकूड, गवारी, ब्रिकेट या वस्तूंची साठवणूक करण्यासाठी आवश्यक जागा देऊन सदर सामान विक्री करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ३७८ त्वर्य
मा.सौ.सुनिता वाडेकर, उपमहापौर यांचे दि.११/६/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेमध्ये मे.केंद्र व मे.राज्य शासन यांचे मार्गदर्शक तत्वानुसार सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रक कार्यक्रम १९९८ पासुन राबविण्यात येत आहे.त्या कार्यक्रमांतर्गत ४८ कर्मचारी एकवट मानधनावर काम करीत आहेत.

सदर कर्मचारी हे क्षयरूग्णांचे निदान व उपचार देण्याचे काम संसर्गाचा धोका असुन देखील प्रामाणिकपणे करीत आहे.

तरी सदर सेवकांना महापालिकेमार्फत वैद्यकीय लाभ,सुरक्षा कवच,जोखीम भत्ता अशा प्रकारचा मुलभुत लाभ देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ३७९ त्वर्य

मा.सौ.वर्षा तापकीर, मा.बाळासाहेब ओसवाल व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि.१५/६/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन कार्यालय यांचेमार्फत आउट सोर्सिंग एजन्सी मार्फत ३ महिने मुदतीकरिता लिपिक संवर्गातील कार्यालयीन सहाय्यक कंत्राटी सेवक नेमणे या कामा अन्वये निविदा क्रमांक पीएमसी/टॅक्स/२०२०/१ या निविदेची मुदत दि १५/०६/२०२१ रोजी संपुष्टात येत असून सदर निविदेस पुढील १ महिना व नवीन निविदा प्रक्रिया राबविणे पर्यंत मुदत वाढ देण्यास मान्यता देण्यात यावी.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.